**प्रसिध्दी पत्रक** दिनांक ०८/१०/२०२४

**आरोपी लोकसेवक-** श्रीकांत मधुकर डुकरे, वय 37 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- कृषी सहाय्यक, नेमणूक- तालुका कृषी अधिकारी कार्यालय सिल्लोड ता. सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजीनगर (वर्ग-3) रा. बालाजीनगर सिल्लोड यांनी तक्रारदार यांच्याकडून रुपये 4000/- लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपतप्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे सिल्लोड शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | श्रीकांत मधुकर डुकरे, वय 37 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- कृषी सहाय्यक, नेमणूक- तालुका कृषी अधिकारी कार्यालय सिल्लोड ता. सिल्लोड जिल्हा छत्रपती संभाजीनगर (वर्ग-3) रा. बालाजीनगर सिल्लोड |
| लाच मागणी रक्कम | :- | 5000/- रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | | 4000/-रुपये. |
| सापळा अधिकारी | :- | श्री. केशव दिंडे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | महाराष्ट्र शासनाचे फळबाग योजनेमधुन तक्रारदार यांचे मस्टर बिल काढण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | | यातील तक्रारदार यांचे चिंचपुर शिवार हद्दीत ता.सिल्लोड, येथे शेत गट नं.150 मध्ये लावलेल्या फळबागाचे महाराष्ट्र शासनाच्या M.R.E.G.S.(मग्रारोहयो),फळबाग योजनेमधुन, फळबाग योजनेतील मस्टर बील काढण्यासाठी आ.लो.से. श्रीकांत डुकरे यांनी तक्रारदार यांच्याकडे 5000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि. 08/10/2024 रोजी पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी दरम्यान आ.लो.से. श्रीकांत डुकरे यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष 5000/-रुपये लाचेची रक्कम मागणी करुन तडजोडी अंती लगेच 4000/- रुपये रक्कम स्विकारणे बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर तर्फे आजच दि. 08/10/2024 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्रीकांत डुकरे यांनी तडजोडी अंती 4000/- रुपये लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडून स्विकारली आहे. लाचेच्या रकमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीस स्टेशन सिल्लोड शहर, ता. सिल्लोड, जिल्हा छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) येथे तक्रारदार यांचे फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा.मुकुंद आघाव, पोलीस उप अधीक्षक मा. सुरेश नाईकनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक केशव दिंडे यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार अशोक नागरगोजे, राजेंद्र सिनकर, चालक पोह. देवसिंग ठाकुर यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांचेशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| संपर्क पत्ता | :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| ई- मेल | :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com |
| ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन | :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064. |
| पोलीस अधीक्षक | :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103 |
| पोलीस उप अधीक्षक | :- 9923247986 |

पोलीस उप अधीक्षक कार्यालय, भ्रष्टाचार प्रतिबंधक ब्युरो, छत्रपती संभाजीनगर

( राजीव तळेकर )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.

Scanned with OKEN Scanner